पुण्यनगरी

# सुरक्षा रक्षक डोंगळे यांचा सत्कार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील सुरक्षा रक्षक विश्वनाथ डोंगळे यांची मुंबई पोलीस दलामध्ये निवड झाली. त्याबद्दल कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते ग्रंथभेट देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. राधानगरी तालुक्यातील घोटवडे गावचे डोंगळे हे माजी सैनिक असून, ३४ मराठा फिल्ड रेजिमेंटमध्ये १७ वर्षे कार्यरत होते. देशसेवा बजावून परतल्यानंतर ते शिवाजी विद्यापीठात सुरक्षा रक्षक म्हणून ४ वर्षांपासून कार्यरत आहेत. नुकतीच त्यांची मुंबई पोलीस भरतीमध्ये कॉन्स्टेबलपदी निवड झाली. त्यांच्या या निवडीबद्दल कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते 'शिवचरित्र' भेट देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले. याप्रसंगी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले आणि उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे उपस्थित होते.